वाहतुक बदल अधिसुचना

जा.क्र./पोउआ/वाहतुक/नियोजन/21449/२०२३ पिंपरी चिंचवड शहर दिनांक -31/05/२०२३

महावीर चौकातुन चिंचवड गावाकडे जाणारा जुना रेल्वे पुल हा कमकुवत झाला असुन सदर पुलाचे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी विवेक पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक अति.कार्य. वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

<u>चिंचवड वाहतुक विभाग</u>

१. महावीर चौकाकडुन चिंचवडगांवाकडे जाणारी जड व अवजड वाहनांना पुला वरुन लोकमान्य हॉस्पीटल चौकात जाण्यास बंदी करण्यात येत आहे.

<u>पर्यायी मार्ग</u> – महावीर चौक- खंडोबा माळ - भक्ती शक्ती येथुन बिजलीनगर मार्गे रिव्हर व्हयु चौक मार्गे ईच्छित स्थळी जातील.

२. महावीर चौकाकडुन चिंचवडगांवाकडे जाणारी दुचाकी/हलकी वाहनांना पुलावरुन लोकमान्य हॉस्पीटल चौकात जाण्यास बंदी करण्यात येत आहे.

<u>पर्यायी मार्ग</u> – महावीर चौकाकडुन खंडोबा माळ चौकातुन डावीकडे वळुन चिंचवडगांव मार्गे ईच्छित स्थळी जातील.

वरील आदेशाची दिनांक 01/06/२०२३ ते दि.31/07/२०२३ पर्यंत अमंलबजावणी करण्यात येणार आहे.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, वरील प्रमाणे वरील वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे अवाहन पिंपरी चिंचवड शहर, वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

31/5

(विवेक पाटील)
पोलीस उप आयुक्त परि १
अति.कार्य.वाहतूक शाखा,पिं.चिं.

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक चिंचवड वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

४) कार्यकारी अभियंता, स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय, पिंपरी चिंचवड

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner